नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०५/२०२५ (शुक्रवार)**

---

## खुनाच्या गुन्हयातील आरोपीतांचा अवघ्या ४ तासच्या आत घेतला शोध
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक १६/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथे फिर्यादी नामे कैलास अशोक ताकोत, रा. शितलामाता मंदीराच्या मागे ,विनोबा भावे वार्ड, रामटेक यांनी रिपोर्ट दिली की, **मृतक नामे हर्षल धनराज कोंटागळे, वय २६ वर्षे, रा.रामटेक याला आरोपी नामे १.दुर्गेश राजकुमार इंगोले आणि २. स्वप्निल उर्फ (दुर्लब कश्यप) राजकुमार इंगोले दोघेही रा. आझाद वार्ड, रामटेक यांनी मृतकाला पैशांचे वादावरून धारधार शस्त्राने वार करून गंभीर जखमी करून त्याचा खुन केला. अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन रामटेक येथे खुनाचा गुन्हा नोंद आहे.**

**नमुद गुन्हयातील दोन्ही आरोपी हे गुन्हा केल्यापासुन मिळुन येत नव्हते.** त्यामुळे सदर घटनेचे गांर्भीय लक्षात घेता मा. श्री रमेश धुमाळ, प्रभारी पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखली रामटेक पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी तात्काळ आरोपीतांचा शोध सुरू केला. **स्थानिक गुन्हे शाखा ,नागपुर ग्रामीण यांच्या पथकांने आरोपीचा कसुन शोध घेतला असता तांत्रिक पुरावे आणि गुप्तबातमीदार यांच्या मदतीने शास्त्रोक्त तपास करून अवघ्या ४ तासात पोलीसांनी १. दुर्गेश राजकुमार इंगोले आणि २. स्वप्निल उर्फ (दुर्लब कश्यप) राजकुमार इंगोले रा आझाद वार्ड, रामटेक यांना जाम. जि. भंडारा येथुन ताब्यात घेतले. सदर आरोपीतांना पुढील तपासकामी रामटेक पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ३ गुन्हे नोंद
## एकुण १ कोटी १६ लाख ३५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— **दिनांक १४/०५/२०२५** रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी ठिकठिकाणी नाकाबंदी करून खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रं १ :—** मौदा पोलीस मथनी टोल नाका येथील महसुल चौकीवर हजर असतांना पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, भंडारा कडुन नागपुर कडे अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे . पोलीसांनी मथनी टोल नाका येथे वाहनांची तपासणी केली असता **ट्रक क्र.एम एच ३६ ए.ए. ४१०४** हा मिळुन आला. त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **अंकीत ज्ञानेश्वर आतिलकर, वय २७ वर्षे रा. गोवरी त. मौदा जि. नागपूर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) १० ब्रास रेती किंमती ५०,००० /— रूपये आणि २) ट्रक क्र.एम एच ३६ ए. ए. ४१०४ किंमती ४५,००,०००/— रूपये असा एकुण ४५,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं २ :—** मौदा पोलीस अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, भंडारा कडुन नागपुर कडे अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे . मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मथनी टि पॉईट येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **ट्रक क्र.एम एच ३६ ए.बी. ४१०४** मिळुन आला. वाहन थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . **वाहन चालक विशाल सिध्दार्थ बारसागडे, वय २७ वर्षे, रा. टेकेपार पुर्नवसन, त. जि. भंडारा हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही**

**परवाना नव्हता.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) १० ब्रास रेती किंमती ५०,००० /– रूपये आणि २) ट्रक क्र.एम एच ट्रक क्र.एम एच ३६ ए.बी. ४१०४ किंमती ४५,००,०००/– रूपये असा एकुण ४५,५०,०००/–रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ३ :– मौदा** पोलीस अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, भंडारा कडुन नागपुर कडे अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे . मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मथनी टोल नाका येथे वाहनांची तपासणी केली असता **ट्रक क्र.एम एच ४० सी.एम. ९९६८** मिळुन आला. वाहन थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . **वाहन चालक विशाल अजय नन्दलाल आंधवने, वय २१ वर्षे, रा. झारीया बहीहर बालाघाट (म.प्र) हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) ५ ब्रास रेती किंमती ३५,००० /– रूपये आणि २) ट्रक क्र.एम एच ४० सी.एम. ९९६८ किंमती २५,००,०००/– रूपये असा एकुण २५,३५,०००/–रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर कारवाईत २८ ब्रास रेती आणि तीन वाहन असा एकुण १,१६,३५,००० /– रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम, सह कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. अन्वये ३ **गुन्हे** दाखल करण्यात आले आहे. **नमुद गुन्हयातील चालक आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द २ गुन्हे नोंद ४ आरोपी अटक, बोरी पोलसांची कामगिरी

पोलीस स्टेशन बोरी :— दिनांक १५/०५/२०२५ रोजी बोरी पोलीसांनी गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, **नागपुर ते हैद्राबाद कडे बुटीबोरी मार्गे गोवंशीय जनावरांचे कत्तलीसाठी अवैधरितत्या वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे बोरी पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई केली.**

कारवाई क्रमांक १ :— **पोलीसांनी बोरखेडी टोलनाका नागपुर ते हैद्राबाद रोड वर** नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **एक आयसर वाहन क्रं एम.एच. ४० सी.डी.१९४५ या वाहनाला** थांबवून वाहन चालकाला नाव पत्ता विचारले असता **आनंद मंसाराम वंजारी, वय ४२ वर्ष, रा. अडयाळ पवणी जि भंडारा, अशी माहीती प्राप्त झाली** . पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी असता वाहनाच्या डाल्यामध्ये त्यामध्ये **१४ गोवंश जनावरे** मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, गळयाला दोरखंडाने निर्दयतेने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. चालकाला अधिक विचारपुस केली त्याने माहीती दिली की, **सदर जनावरे ही मोहम्मद अकरम मोहम्मद रहमान कुरेशी याच्या मालकीचे असुन वाहन मालक नामे अब्दुल अकील शेख अब्दुल करीम शेख,वय ५२ वर्षे. रा. अडयाळ, पवणी. जि. भंडारा यांच्या सांगण्यावरून सदर जनावरे सानगडी जि. भंडारा येथुन साठापुर येथे नेत असल्याबाबत माहीती मिळाली. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून आयसर वाहन क्रमांक** एम.एच. ४० सी.डी.१९४५ **किंमती १५,००,०००/— रू. व १४ गोवंश जनावरे किंमती १,४०,००० /— रू. असा एकूण किंमती १५,४०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

कारवाई क्रमांक २ :— **पोलीसांनी बुटीबोरी बसस्टॉप परीसरात नागपुर ते हैद्राबाद रोड वर** नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक आयसर वाहन क्रं **एम.एच. ४० सी.टी .६४२२ या वाहनाला** थांबवून वाहन चालक आणि क्लिनर यांना नाव पत्ता विचारले असता **१. चालक नामे ईरशाद निसार खान, वय ३३ वर्षे, रा.चंगेरा,ता.जि.गोंदिया, आणि २. क्लिनर नामे राशीद हिदायत खान, वय ४० वर्षे, राह. चंगेरा, ता.जि. गोंदिया** अशी नावे समजली . पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी असता वाहनाच्या डाल्यामध्ये त्यामध्ये **१४ गोवंश जनावरे** मिळुन

आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, गळयाला दोरखंडाने निर्दयतेने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. चालकाला अधिक विचारपुस केली त्याने माहीती दिली की, **सदर जनावरे आणि वाहन हे आरोपी नामे ही आकीब आबीद खान, वय २८ वर्षे, रा. चंगेरा ता.जि.गोंदिया याच्या मालकीचे त्याच्या सांगणेप्रमाणे रावणवाडी. जि. गोंदीया येथुन हैद्राबाद येथे नेत असल्याबाबत माहीती मिळाली**. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून** आयसर वाहन क्रमांक क्रं **एम.एच. ४० सी.टी .६४२२ किंमती १५,००,०००/— रू. , १४ गोवंश जनावरे किंमती २,२५,००० /— रूपये आणि आरोपी चालकाच्या ताब्यातुन एक ॲड्रॉईड मोबाईल किंमती २१,०००/—रूपये असा एकूण किंमती १७,४६,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सुटका केलेल्या जनावारांच्या देखभालीकरीता त्यांना औंदुबर गौशाळा,तुरकमारी येथे दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद दोन्ही कारवाई मधील आरोपीतांविरूध्द याच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये दोन्ह स्वतंत्र गुन्हे नोंद करण्यात आले आहे. आरोपी नामे. १. आनंद मंसाराम वंजारी वय ४२ वर्ष रा अडयाळ पवणी जि भंडारा, २. अब्दुल अकील शेख अब्दुल करीम शेख,वय ५२ वर्षे. रा. अडयाळ, पवणी. जि. भंडारा ३. ईरशाद निसार खान, वय ३३ वर्षे, रा.चंगेरा,ता.जि.गोंदिया, आणि ४. क्लिनर नामे राशीद हिदायत खान, वय ४० वर्षे, राह. चंगेरा,ता.जि. गोंदिया यांना अटक करण्यात आली आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ३ आरोपी अटक ,२१ जनावरांची सुटका,मौदा पोलसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १६/०५/२०२५ रोजी मौदा पोलीस ,पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भामेवाडा ते वडोदा रोडने ट्रक **मध्ये** अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **वडोदा** शिवारातील मुरली ॲग्रो कंपनीचे लगन असलेल्या भामेवाडा ते वडोदा रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **ट्रक क्रमांक एम. एच. ४० बी.जी ४०७६ येताना दिसले**. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली त्यात जनावारे मिळुन आली. वाहनामध्ये चालकासह दोन ईसम मिळुन आले त्यांना नाव पत्ता विचारले असता **वाहन चालक /मालक रमीज रजा खान वल्द जमीर खान, वय २५ वर्षे,रा. घर क्रं ८८५, कमर कॉलनी ,कामगार नगर चौक, नागपुर ,जनावरांचा मालक आरोपी क्रं २ नामे अब्दुल मुजीबुल हक बल्द महरूम अब्दुल हक ,वय ३२ वर्षे,रा. मदन चौक, कामठी आणि जनावरे वाहनात भरण्यास मदत करणारा आरोपी क्र ३ शंकश नत्थुजी दारूटे, वय ४२ वर्षे,रा वार्ड क्र २,वडोदा,ता कामठी जि नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली. सदर वाहनामध्ये **२१ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक ट्रक क्रमांक एम. एच. ४० बी.जी ४०७६ किंमती ४५,००,०००/— रूपये. व २१ गोवंश जनावरे किंमती २,१०,००० /— रूपयांचा एकुण किंमती ४७,१०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या जनावरांना गौरक्षण केंद्रात दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद तिन्ही आरोपीतांच्या याच्या विरूध्द कलम ११(१) (ड) (ई) (फ) प्रा. छ. अधि. सहकलम ५ (ए) ,९ महा. पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तिन्ही आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**




**अंमलीपदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद,**
**खापरखेडा पोलीसांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक १५/०४/२०२५ रोजी खापरखेडा पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, ईश्वर गुलाब लाड, रा. वार्ड न. ०२, खापरखेडा हा खापरखेडा रेल्वे फाटका जवळ त्याचे फुटान्याचे दुकानात ,अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी पंचासह घटनास्थळी जावुन **अरोपी नामे ईश्वर गुलाब लाड, वय ७० वर्षे, रा. वार्ड न. ०२ खापरखेडा** याचे दुकानाची झडती घेतली असता दुकानात **१७ चिलम लालचिंदी सह किंमती १७०/— रूपये व १७४०.५ ग्राम वाजनाचा अंमली पदार्थ (गांजा) किंमती ३,०००/— रूपये असा एकुण किंमती ३,१७०/—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास खापरखेडा पोलीस करत आहे.**

## तोतयेगिरी करून मंगळसुत्र बळकावणाऱ्या महीला आरोपीचा २४ तासात शोध रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक :—** फिर्यादी नामे सौ. मिराबाई शामराव भोयर, वय ६० वर्षे, रा. मारोडी, ता. मौदा, जि. नागपुर या काही कामा निमित्य दिनांक १२/०५/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता सुमारास आपले पतीसह काचुरवाही येथे जाणे करीता रामटेक बसस्टॉप येथे गेल्या असता एक अज्ञात महीला आरोपीने फिर्यादी हिला मी अंगनवाडी सेविका आहे. तुझे बॅकेचे तसेच शासनाचे पैसे काढुन देतो त्याकरीता मला ७०००/— रूपये दे असे म्हणाली. फिर्यादीने आरोपी महीलेस माझेकडे ऐवढे पैसे नाही असे सांगितले असता त्या अज्ञात महीलेने फिर्यादीचा विश्वास संपादन करून फिर्यादी च्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र मागितल्याने फिर्यादी हिने आपल्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ९ ग्रॅम व नगदी ६००/— रूपये आरोपीला दिले. त्यानंतर आरोपी महीला हि फिर्यादीस मी १० मिनीटात परत येते असे म्हणुन निघुन गेली आणि परत आली नाही. फिर्यादीच्या रिपोर्ट वरून दिनांक १४/०५/२०२४ रोजी रामटेक पोलीस स्टेशन येथे कलम २०४, ३१६(२) भा.न्या.सं २०२३ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

**मा. श्री रमेश धुमाळ, प्रभारी पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी ,रामटेक विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. आसाराम शेटे यांनी पोलीस स्टेशन रामटेक येथील गुन्हे प्रगटीकरण पथकास गुन्हा उघडकीस आणण्याबाबत योग्या मार्गदर्शन केले. गुन्हे प्रगटीकरण पथकाने तांत्रिक पुरावे आणि गुप्तबातमीदारांचे माहितीचे आधारे अवघ्या २४ तासाचे आत आरोपी निष्पन्न करुन महीला आरोपीस ताब्यात घेवुन तिचे ताब्यातुन सोन्याचा ऐवज जप्त केला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने